# * प्रस्तावना *

## -: प्रस्तावना :-

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये दलितांची लोकसंख्या दहा कोटीच्या जवळपास आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ४० वर्षानंतरही या समाजाची सर्वांगिण प्रगती झालेली दिसत नाही. अजूनही हा समाज आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीकोनातून दुभंगलेल्या अवस्थेत आहे. या समाजाकडे उपजिविकेसाठी लागणारी साधनसामुग्री फारच तुटपुंजी आहे. या समाजातील बहुतांशी लोक एकतर भूमीहिन शेतमजूर व कांहीजण कमी मिळकतीचा व्यवसाय करतांना आपल्याला दिसतात. भारतामध्ये असे सांगितले जाते की, भारताची विविध क्षेत्रांमध्ये बरीच प्रगती व विकास झाला. परंतु या विकासाचा लाभ दलित समाजातील लोकांना पाहिजे तेवढा मिळालेला नाही. हा समाज अशा दुष्ट चक्रामध्ये सापडलेला आहे की, त्यामध्ये त्यांना आपल्या अस्तित्वासाठी श्रीमंत लोकांवरती अवलंबून रहावे लागते. कारण शासनाने ज्या कांही थोडयाबहुत विकासाच्या योजना व धोरणे स्विकारलीत या योजनांचा फायदा दलित घेऊ शकत नाहीत. अशाप्रकारे देशातील एकूण लोकसंख्येमध्ये दलित समाज हा दारिद्र्यात खितपत पडलेला आहे. शिवाय सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून या समाजावरील अत्याचार कमी झालेले नसून वाढत आहेत.

भारतीय सरंजामी अर्थव्यवस्थेत दलितांचे जीवन गुलामगिरीचे होते. दलित समाजावर उच्चवर्णियांनी लादलेल्या सामाजिक निर्बंधामुळे या समाजाला आर्थिक क्षेत्रामध्ये प्रगती करण्यासाठी मज्जाव केला होता. पर्यायाने हा समाज मागासलेला राहीला. दलित समाजाच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी भगवान बुध्दांनी प्रयत्न केला. परंतु येथील सवर्ण

व्यवस्थेने बौध्द धर्मासारखा पुरोगामी विचारसुध्दा संपवून टाकला.

भारतातील ब्रिटीश आगमनानंतर एकतर दलितांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. त्यांनी महाराष्ट्रामध्ये दलितोध्दाराचे विचार मांडले व दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक चळवळी केल्या. फुल्यांचा वारसा घेऊन दलितोध्दाराची चळवळ पुढे नेण्यासाठी राजर्षि छत्रपती शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जिकिरीचे प्रयत्न केले. स्वत: आंबेडकरांनी दलितांच्या सर्वांगिण मुक्तीसाठी भारतीय सरंजामी अर्थव्यवस्थेवर विचारांच्या पातळीवरती तसेच व्यवहाराच्या पातळीवरती हल्ले करून दलितांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलितांच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र सरकारने तसेच राज्यसरकारने विविध योजना आखल्या. पंचवार्षिक योजनेमध्ये आर्थिक तरतुदी केल्या. परंतु या तरतुदी अतिशय तुटपुंज्या होत्या व योजना अव्यावहारिक होत्या. दलितांचे होणारे शोषण थांबलेले नाही. भारतामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजव्यवस्थेमध्ये व आर्थिक व्यवस्थेमध्ये बदल झालेत. औद्योगिक क्षेत्रामध्ये कच्च्या मालाच्या वाढत्या पुरवठयामुळे नवनवीन कारखाने व तांत्रिकदृष्टया प्रगत यंत्र-सामुग्रीमुळे उत्पादनात वाढ झाली. या बदलत्या परिस्थितीचा भाग म्हणून पारंपारिक ग्रामिण रचनेत बदल घडून आले. कापड उद्योगातसुध्दा मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. त्याचप्रमाणे राज्य सरकारने व केंद्र सरकारने ग्रामिण कृषिप्रधान समाजाचा विकास व्हावा म्हणून अनेक विकासाच्या योजना आखल्या. जमिन सुधारणेचे कायदे केले. या

सरकारी धोरणामुळे ग्रामिण रचनेमध्ये बरेचसे बदल घडून आले. या बदलाचा भाग म्हणून ग्रामिण भागात सर्व जातीतील शेतमजूरांचा वर्ग वाढत गेला. त्यामुळे ग्रामिण भागातील बेकारी वाढली म्हणून दलित समाज जो पारंपारिक दृष्टीकोनातून शेतमजूर होता त्याला ग्रामिण अर्थव्यवस्थेमध्ये रोजगार मिळणे कठीण झाले. उपजिविकेच्या शोधासाठी महाराष्ट्रातील दलित वेगवेगळया औद्योगिक शहरांमध्ये उदा. नागपूर, मुंबई इ. ठिकाणी कापड गिरण्यांमधून काम करू लागला.

दक्षिण महाराष्ट्रातील इचलकरंजी हे शहर मालेगांव व भिवंडीच्या बरोबरीने वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये अग्रेसर आहे. या शहराला "महाराष्ट्राचे मँचेस्टर" म्हणतात. कारण इचलकरंजीत फार मोठया प्रमाणात म्हणजेच ६०,००० पेक्षा जास्त यंत्रमाग आहेत. त्याचप्रमाणे यंत्रमाग उद्योगात काम करणा-या कामगारांची संख्या जवळजवळ लाखाच्या आसपास आहे. या कामगारांमध्ये आणि कारखान्यांमध्ये गेल्या तीस वर्षात दलित उद्योजक व कामगारांची संख्या बरीच वाढलेली आहे. परंतु दलितांची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती पहाता त्यांच्या विकासाचा क्रम व विकासाचे साधन याबद्दलचा शास्त्रशुध्द अभ्यास अजूनही आपल्याकडे उपलब्ध नाही.

इचलकरंजीच्या यंत्रमाग व्यवसायाबद्दल व कामगारांच्या परिस्थितीबद्दल कांही संशोधकांनी पी.एच.डी. व एम.फिल्.साठी कांही प्रबंध लिहीलेत. त्यापैकी महत्वाचे प्रबंध म्हणजे शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे डॉ. राजेंद्र पाटील यांनी "इचलकरंजीतील औद्योगिक कामगार - एक सामाजिक अभ्यास" हा

पी.एच.डी. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठाला प्रबंध सादर केला. या प्रबंधामध्ये पाटील यांनी मुख्यत: वस्त्रोद्योगातील कामगार व त्यांची सामाजिक परिस्थिती यावरच अधिक भर दिला. हा अभ्यास करीत असतांना कामगारांची सामाजिक पार्श्वभूमी उदा. त्यांची जात, धर्म यावरच आपले लक्ष केंद्रित केले. त्यांनी अभ्यासासाठी निवडलेल्या ३०२ कामगारांमध्ये केवळ ५ नवबौध्द कामगार असलेले आढळून आले. त्याचप्रमाणे त्यांनी निवडलेल्या घटकांमध्ये महार, मांग, चांभार मिळून २६ कामगारांचा अंतर्भाव त्यांनी केलेला दिसतो. १

त्यांचा मूळ विषय एकूणच कामगारांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीची पहाणी हा असल्यामुळे दलित कामगारांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीची तपशीलाने त्यांनी मांडणी केलेली दिसत नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू व उद्देश वस्त्रोद्योग कामगार हाच असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांनी दलित उद्योजकांचा विचार केलेला नाही.

इचलकरंजीच्या यंत्रमाग कामगारांच्या संबंधी प्रा.अशोक जाधव यांनीही "इचलकरंजीतील कामगार चळवळ" या विषयावरती शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. पदवीसाठी शोध निबंध सादर केला. सर्वसामान्यपणे या शोध निबंधात यंत्रमाग कामगारांची चळवळ, तिचे स्वरूप, रचना व नेतृत्वाविषयी मांडणी केलेली दिसते. त्यामुळे दलित कामगार व दलित मागधारक यांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संबंधाविषयी जाधवांच्या प्रबंधामध्ये फारशी चर्चा दिसत नाही. २

अर्थशास्त्राचे प्रा.अर्जुन राजगे यांनीसुध्दा आपल्या एम्.फिल्. पदवीसाठी "इचलकरंजीतील विकेंद्रित यंत्रमाग उद्योगाच्या समस्या आणि उपाय" या विषयावर शोधनिबंध शिवाजी विद्यापीठास सादर केला. या प्रबंधामध्ये इचलकरंजीतील यंत्रमाग व्यवसाय व त्याच्या विकास - मार्गातील समस्यांविषयी चर्चा केल्याचे आपणास आढळून येते. या विकासातील समस्यांचा विचार त्यांनी ऐतिहासिक दृष्टीकोनातून केलेला आहे असे दिसून येते. या समस्यांमध्ये बाजारपेठ, कच्चा माल, तांत्रिक साधनांचा अभाव इ.समस्यांचा विचार त्यांनी केलेला आहे.

त्याचप्रमाणे यंत्रमाग उद्योगाच्या विकासासाठी प्रा. राजगे यांनी उपाय सुचविलेले आहेत. परंतु त्यांच्या संशोधनामध्ये असे आढळते की, सर्वसामान्यपणे त्यांनी विकेंद्रित वस्त्रोद्योगाचा अभ्यास केला असल्यामुळे दलित उद्योजकांच्या विशिष्ट समस्यांबद्दलची चर्चा केलेली ~~हि~~ आढळून येत नाही. ३

याशिवाय पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते व संशोधक श्रीयुत अनिल अवचट यांनीसुध्दा इचलकरंजीतील वस्त्रोद्योगाविषयी लिहितांना या उद्योगातील"कामगार चळवळ व मालक-कामगार संबंध" इ. बाबींची चर्चा केलेली आहे. परंतु दलित कामगारांचे व दलित कारखानदारांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्न यावर चर्चा केलेली आढळून येत नाही. ४

या पार्श्वभूमीवर उपरोक्त माहीतीप्रमाणे इतर समाजातील कामगार व उद्योजकाबरोबर दलित कामगारांचा व उद्योजकांचा सहभाग असल्यामुळे खालील महत्वाच्या प्रश्नासंबंधी संशोधन करणे महत्वाचे आहे.

१] सरंजामी अर्थव्यवस्थेतील दलितांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दर्जा कोणता होता हे तपासणे महत्वाचे आहे. कारण या अर्थव्यवस्थेमध्ये दलित समाज अतिशय कनिष्ठ स्तरावर असल्यामुळे आपल्या विकासासाठी त्याला साधने उपलब्ध नव्हती. परंतु ग्रामिण तसेच शहरी अर्थव्यवस्थेमध्ये अलिकडच्या काळामध्ये दलित समाजाचा सहभाग वाढल्यामुळे त्यांच्या पारंपारिक,सामाजिक आणि आर्थिक दर्जामध्ये बदल झालेला दिसतो. तेंव्हा या पार्श्वभूमीवर त्यांच्या बदलाला कारणीभूत ठरलेली आर्थिक आणि राजकीय साधने कोणती हे तपासणे हा या प्रबंधाचा पहिला उद्देश आहे. हे तपासत असतांना त्यांच्या राजकीय जाणिवांमध्ये कुठल्या प्रकारची स्थित्यंतरे घडलीत हे तपासणे महत्वाचे आहे.

२] दलितांच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा भाग म्हणून त्यांच्या राजकीय जाणिवेत कुठल्या प्रकारचे बदल झाले किंवा नाही हे पहाणे महत्वाचे आहे. कारण विशेषत: दलित कामगार आणि दलित मालक यांची एकच सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेता त्यांच्या आर्थिक व राजकीय संबंधाचा सामाजिक ऋणानुबंधावरती कोणता परिणाम झाला हे तपासून पहाणे हा प्रबंधाचा दुसरा उद्देश आहे.

३] दलित कामगार आणि दलित मालधारकांच्या ज्ञातीसंबंधाचा समग्र कामगार चळवळीवर काय परिणाम झाला हे तपासून पहाणे हे तिसरे उद्दीष्ट आहे.

४] दलित उद्योजक म्हणून या वर्गाचे इतर उद्योजकांशी किंवा त्या उद्योजकांच्या राजकीय संघटनांशी कसे संबंध आहेत हे शोधणे हे या प्रबंधाचे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शेवटचे उद्दीष्ट आहे.

अन्वेषण पद्धती :-

या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी इचलकरंजीतील यंत्रमाग उद्योग निवडण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी इचलकरंजीतील यंत्रमाग उद्योग उपयुक्त वाटला कारण इचलकरंजी शहराच्या आर्थिक व सामाजिक रचनेमध्ये आमुलाग्र बदल घडून आलेले आहेत. पूर्वी इचलकरंजी शहर हे जहागिर होते. परंतु आता हे सरंजामी संबंध संपूर्ण बदललेले आहेत. या शोधनिबंधासाठी दलित समाजातील काही कामगार व कांही उद्योजकांच्या मुलाखती घेतल्या.

या संशोधनासाठी इंपिरिकल पद्धतीचा व माहिती गोळा करण्यासाठी "स्नो बॉल सँपलींगचा" उपयोग करण्यांत आला. त्याचप्रमाणे प्रबंधासाठी लागणारी माहीती गोळा करण्यासाठी सरकारी कागदपत्रे, यंत्रमागधारकांच्या विविध सहकारी संस्थाचे अहवाल, पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे इ. विविध प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यांत आला. या अभ्यासाचा कालावधी १९६० ते १९८७ इतका ठरविण्यात आला. कारण याच कालावधीत इचलकरंजीतील वस्त्रोद्योग व्यवसायात अनेक महत्त्वाच्या घडामोडी झाल्या.

-=0=-

# -* संदर्भ सूचि *-


१. डॉ. राजेंद्र पाटील – "इचलकरंजीतील औद्योगिक कामगार – एक सामाजिक अभ्यास" पी.एच.डी.साठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध.१९८२. पृष्ठ क्र. ५६

२. प्रा. अशोक जाधव – "इचलकरंजीतील कामगार चळवळ" एम.फील्.साठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध. १९८५.

३. प्रा. अर्जून राजगे – "इचलकरंजीतील विकेंद्रित यंत्रमाग उद्योगाच्या समस्या आणि उपाय" एम.फिल्.साठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध. १९८८.

४. श्री. अनिल अवचट – "धागे आडवे उभे" मॅजेस्टीक प्रकाशन ,मुंबई.


-=0=-